महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र : एनयुआर- २०१८/ प्र.क्र.९१ / परिचर्या
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय
गो. ते. रुग्णालय आवार (७ वा मजला),
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ०४ मे, २०१८

प्रति,
संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- अधिक्षिका, शुश्रुषा सेवा, वर्ग-१ वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई या पदाचा तात्पुरता अतिरिक्त कार्यभार देणेबाबत.

संदर्भ :-
१. संचालक, वै.शि.व संशोधन यांचे क्र.एमएमईआरएस/एसएनएस/ अति. कार्य/ निवेदने/१/क, ९६२५, दि.०१.०८.२०१७ चे पत्र
२. संचालक, वै.शि.व संशोधन यांचे क्र.एमएमईआरएस/अति.कार्य/ अधिक्षिका, शुश्रुषा सेवा/ डॉ.लहाने/ अधिष्ठाता/ मुंबई/ १/क, दि.०१.०७.२०१७ चे पत्र

वरील विषयाबाबतच्या संदर्भांकित पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, अधिक्षिका, शुश्रुषा सेवा, वर्ग-१ या पदावर सरळ सेवेने नियुक्तीसाठीचे प्रकरण मा.म.प्र.न्यायाधिकरण, मुंबई येथे प्रलंबित आहे. सद्यस्थितीत या पदाचा अतिरिक्त कार्यभार संदर्भ क्र.२ येथील आदेशान्वये सहसंचालक (वैद्यकीय), वै.शि.व सं., मुंबई यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

२. श्रीमती शोभा करडक (चाटसे), अधिसेविका, सर.ज.जी.समूह रूग्णालये, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०४.०४.२०१८ च्या निवेदनान्वये सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. श्रीमती शोभा करडक (चाटसे) यांनी अधिक्षिका, शुश्रुषा सेवा, वर्ग-१ या पदाचा अतिरिक्त कार्यभार यापूर्वी दि.०१.०७.२०१५ ते दि.३०.०६.२०१६ या कालावधीत सांभाळलेला आहे.

३. श्रीमती करडक यांचा त्या पदाचा अनुभव विचारात घेवून मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडे प्रलंबित न्यायालयीन प्रकरणाच्या अंतरिम/अंतिम निर्णयाच्या अधीन राहून किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अधिक्षिका,

शुश्रुषा सेवा, वर्ग-१ वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई या पदाचा तात्पुरता अतिरिक्त कार्यभार श्रीमती शोभा करडक (चाटसे), अधिसेविका, सर.ज.जी.समूह रूग्णालये, मुंबई यांचेकडे सोपविण्यात येत आहे. सहसंचालक (वैद्यकीय), वै.शि.व सं., मुंबई यांना सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्याबाबतचे संदर्भ क्र.२ येथील आदेश या पत्रान्वये रद्द करण्यात येत आहेत.

४. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५०४१२५३२१२३१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

MAHAJAN HEMANT ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drug Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa, cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.05.05 15:35:08 +05'30'

(हेमंत महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- माहितीस्तव

सहसंचालक (वैद्यकीय), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.